नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ८३ Issue - 83 | वार शनिवार दि. ९ ऑगस्ट २०२५३ Blow- Saturday Date 9 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# रशिया-भारत भागीदारी भक्कम करण्यावर एकमत

## नरेंद्र मोदींचा रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांना फोन, भारत दौऱ्याचं आमंत्रण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यासोबत फोनवर चर्चा केली. यावेळी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी यूक्रेन सोबत सुरु असलेल्या युद्धासंदर्भातील स्थिती काय आहे याची माहिती नरेंद्र मोदी यांना दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्लादिमीर पुतिन यांना भारत दौऱ्याचं आमंत्रण देखील दिलं.

पीआयबीच्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकानुसार, रशियाचे अध्यक्ष पुतिन यांनी नरेंद्र मोदी यांना यूक्रेन युद्धासंदर्भातील ताज्या घडामोडींची अपडेट दिली आहे. नरेंद्र मोदी यांनी पुतिन यांनी दिलेल्या सविस्तर माहितीसंदर्भात धन्यवाद दिले आहेत. रशिया-यूक्रेन संघर्ष शांततेच्या मार्गानं सोडवावा ही भारताची भूमिका नरेंद्र मोदी यांनी मांडली.

नरेंद्र मोदी आणि व्लादिमीर पुतिन यांच्या चर्चेत दोन्ही नेत्यांनी भारत आणि रशिया यांच्यातील संबंध आणि द्विपक्षीय अजेंडा यामध्ये झालेल्या प्रगतीचा आढावा घेतला. दोन्ही



देशांमध्ये विशेष आणि विशेषाधिकार प्राप्त राजनैतिक भागीदारी अधिक वाढवण्याबाबत कटिबद्ध राहण्याबाबत चर्चा झाली.

मोदी यांच्याकडून पुतिन यांना भारत दौऱ्याचं आमंत्रण

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे अध्यक्ष पुतिन यांना या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या भारत रशियाच्या वार्षिक द्विपक्षीय शिखर संमेलनासाठी भारतात येण्याचं निमंत्रण देखील दिलं. रशियाचे अध्यक्ष पुतिन भारत दौऱ्यावर आल्यानंतर दोन्ही देशांमध्ये व्यापार, संरक्षण आणि ऊर्जा क्षेत्रातील सहकार्य वाढवण्याची आणि त्याला वेग मिळण्याची अपेक्षा आहे.

ट्रम्प टॅरिफच्या पार्श्वभूमीवर चर्चा

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ६ ऑगस्ट रोजी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदी आणि व्लादिमीर पुतिन यांच्यातील चर्चेला महत्त्व प्राप्त झालं आहे. भारतानं रशियाकडून तेल खरेदी सुरु ठेवल्यानं संतापलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या आठवड्यात भारतावर २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली होती. त्यावेळी रशियासोबत शस्त्र आणि तेल खरेदी संदर्भातील व्यापार सुरु ठेवल्यानं दंड आकारणार असल्याचं त्यांनी जाहीर केलं होतं. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी जोपर्यंत टॅरिफ संदर्भातील प्रश्न मिटत नाही तोपर्यंत भारतासोबत चर्चा करणार नसल्याचं म्हटलंय.

दरम्यान, भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल हे नुकतेच रशियाच्या दौऱ्यावर गेले होते. तिथं त्यांनी दोन्ही देशांच्या आगामी वाटचालीसंदर्भात चर्चा केली. भारताचे विदेश मंत्री एस जयशंकर येत्या काही दिवसांमध्ये रशियाला जाणार आहेत.

# टॅरिफ बॉम्बनंतर भारताचा पलटवार सुरु; मोदी सरकारचा मोठा निर्णय, अमेरिकेला पहिला धक्का

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली: अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लादण्याचा निर्णय घेतला. अमेरिकेनं भारतावर एकूण ५० टक्के टॅरिफ लागू केलं आहे. यानंतर आता भारत सरकार पलटवार करण्याच्या पवित्र्यात आहे. अमेरिकेकडून हत्यारं आणि विमानं खरेदीची योजना स्थगित केल्याचं वृत्त रॉयटर्स या वृत्तसंस्थेनं दिलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर टॅरिफ बॉम्ब टाकत चर्चेची दारं बंद केल्यावर भारत सरकारनं आपला रोष दाखवणारं पहिलं पाऊल उचललं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह काही दिवसांनंतर अमेरिकेचा दौरा करणार होते. भारताकडून काही संरक्षण साहित्य खरेदींच्या घोषणा होणार होत्या. पण अद्याप तरी त्या झालेल्या नाहीत. त्यामुळे भारतानं पर्याय खुले ठेवले आहेत.

राजनाथ सिंह यांचा अमेरिकेचा दौरा रद्द झाल्याची माहिती रॉयटर्सनं सरकारमधील उच्चपदस्थ सुत्रांच्या हवाल्यानं दिली आहे. ट्रम्प यांनी ६ ऑगस्टला भारतावर अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली. त्यामुळे भारतीय वस्तू, सामानांवरील एकूण टॅरिफ ५० टक्क्यांवर पोहोचलं आहे. अमेरिकेनं सर्वाधिक टॅरिफ भारतावरच लादलं आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याचा अमेरिकेचा आक्षेप आहे. विशेष म्हणजे युरोपियन युनियनमधील अनेक देशही रशियाकडून तेल खरेदी करत असताना अमेरिकेनं त्यांच्यावर मात्र शून्य टक्के टॅरिफ लादलेलं आहे. अमेरिकेच्या या दुटप्पीपणाला भारतानं उत्तर देण्यास सुरुवात केली आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प टॅरिफवरुन सातत्यानं त्यांची भूमिका बदलत असतात. भूतकाळात त्यांच्या धोरण सातत्यातील अभाव वारंवार दिसून आला आहे. भारताकडून अमेरिकेसोबत चर्चा केली जात आहे. टॅरिफवरील दिशा स्पष्ट झाल्यावर भारत संरक्षण खरेदीसंदर्भात ठोस निर्णय घेईल, अशी सुत्रांची माहिती आहे. यासंदर्भात भारताच्या संरक्षण मंत्रालय आणि पँटॉगॉननं कोणत्याही प्रश्नांची उत्तरं दिली नसल्याचं रॉयटर्सनं वृत्तात नमूद केलं आहे. अमेरिकेकडून अनुचित पद्धतीनं लक्ष्य केलं जात असल्याचं भारतानं म्हटलं आहे. अमेरिका आणि त्यांचे सहकारी असलेले युरोपियन देश रशियासोबत व्यापार करतात. पण भारताला लक्ष्य केलं जात असल्याचं भारताकडून सांगण्यात आलं आहे.

# राज्यात ऑगस्टच्या मध्यापासून पाऊस परतणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईमध्ये बुधवार रात्रीपासून पावसाचे प्रमाण वाढले असून याचा परिणाम गुरुवारी कमाल तापमानावर दिसून आला. गुरुवारी सकाळपासूनच मुंबईमध्ये पावसाची संततधार राहिली. अनेक दिवसांनंतर मुंबईकरांनी पुन्हा पावसाळ्यासारखा पाऊस अनुभवल्याने तापमानातही घट झाली. सांताक्रूझ येथे गुरुवारी ३०.५, तर कुलाबा येथे २८.७ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.

गुरुवार सकाळी ८ वाजेपर्यंतच्या २४ तासांमध्ये कुलाबा येथे १०.२, तर सांताक्रूझ येथे ३५.३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. त्यानंतरही गुरुवारी दुपारपर्यंत पावसाची झड कायम होती. कुलाबा येथे दिवसभरात ०.८,



तर सांताक्रूझ येथे ६.८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. सकाळी मुंबईत तुरळक ठिकाणी एखाद-दुसरी जोरदार सर आल्याने मुंबईमध्ये पावसाचा वेग वाढेल, अशी शक्यता निर्माण झाली होती. मात्र दुपारनंतर पावसाची जोर कमी झाला.

बुधवारी मुंबईत कुलाबा येथे ३०.४, तर सांताक्रूझ येथे ३१.९ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले होते. त्यानंतर पावसाच्या उपस्थितीने २४ तासांमध्ये कुलाबा येथे १.७अंशांनी तर सांताक्रूझ येथे १.४ अंशांनी तापमान उतरले, गुरुवारी सकाळी किमान तापमानातही घट झाली. कुलाबा येथे २४.९ तर सांताक्रूझ येथे २५ अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदले गेले. हे तापमानही बुधवारपेक्षा अनुक्रमे १.३ आणि एक अंशांनी कमी होते. मालेगाव येथे सरासरीपेक्षा तब्बल ६.३ अंशांनी कमाल तापमान अधिक होते. मालेगाव येथे ३५.६ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. हे तापमान बुधवारपेक्षा तीन अंशांनी अधिक होते. विदर्भामध्ये अकोला येथे राज्यातील सर्वाधिक कमाल तापमान गुरुवारी नोंदले गेले. अकोला येथे ३५.८ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची गुरुवारी नोंद झाली. हे तापमान सरासरीपेक्षा ५.९ अंशांनी अधिक होते, अमरावती येथेही कमाल तापमान ४.७ अंशांनी, यवतमाळ येथे सरासरीपेक्षा ६.१ अंशांनी अधिक होते. वातावरणातील उष्णतेमुळे तसेच वातावरणीय प्रणालीमुळे विदर्भामध्ये मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. गुरुवारी पुढच्या दोन आठवड्यांतील देशभरातील पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला असून ऑगस्टच्या मध्यापासून पावसाचे प्रमाण वाढू लागेल, यामध्ये मध्य भारताचा समावेश असून महाराष्ट्रातही या कालावधीत पावसाच्या प्रमाणात वाढ होईल. १४ ऑगस्टपासून पाऊस सरासरीपेक्षा जास्त पडेल अशी शक्यता आहे.

# दृष्टिहीन मुली, आदिवासी विद्यार्थिनी, बचत गट महिलांकडून राज्यपालांना रक्षाबंधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दृष्टिहीन विद्यार्थिनी, ठाणे, रायगड व पालघर जिल्ह्यातून आलेल्या आदिवासी विद्यार्थिनी, मुंबई महानगर पालिकेअंतर्गत महिला बचत गटाच्या सदस्यांनी तसेच पालिकेच्या शाळांमधील विद्यार्थिनींनी रक्षाबंधनानिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना राखी बांधली व ओवाळले. विवेक रुरल डेव्हलपमेंट सेंटर, भालिवली, जिल्हा पालघर येथून आलेल्या आदिवासी महिलांनाही राज्यपालांना बांबूपासून तयार केलेली राखी बांधली.

रक्षाबंधनानिमित्त विविध संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थिनी, भगिनी व बांधवांनी गुरुवारी (दि. ७) राज्यपालांची राजभवन येथे भेट घेऊन त्यांना राखी बांधली व ओवाळले. यावेळी राज्यपालांनी सर्वांच्या राखीचा विनम्रपणे स्वीकार करीत सर्वांची विचारपूस केली व भेटवस्तू दिल्या.

राज्यपालांची भेट घेतलेल्या संस्थांमध्ये सिंधुताई सपकाळ यांनी सुरु केलेले ममता बाल सदन (बालगृह), कुंभारवळण, मुंबई महानगरपालिका शाळेतील विद्यार्थिनी, मुंबई मनपा अंतर्गत विविध महिला बचत गटांच्या सदस्य, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर,जिल्हा ठाणे येथील विद्यार्थिनी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण (जिल्हा रायगड) येथील विद्यार्थीनी, नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब)च्या येथील दृष्टिहीन विद्यार्थिनी, प्रतीक्षा महिला बचत गटातील महिला यांचा समावेश होता.

भारत विकास परिषद, माटुंगा तसेच प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या भगिनी व बांधवांनी देखील राज्यपालांना राखी बांधली.



**दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांची जोरदार घोषणाबाजी**

**पोलिसांच्या सतर्कतेनं स्थिती नियंत्रणात**

# वरळी कोळीवाड्यात एकनाथ शिंदे-आदित्य ठाकरे आमने सामने

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नारळी पौर्णिमेच्या निमित्तानं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि वरळीचे आमदार आदित्य ठाकरे वरळीत आमने सामने आल्याचं पाहायला मिळालं. यावेळी ठाकरेंच्या शिवसेनेचे आणि एकनाथ शिंदेंच्या सेनेचे कार्यकर्ते आमने सामने आल्याचं पाहायला मिळालं. वरळीच्या कोळीवाड्यात दोन्ही सेनेच्या कार्यकर्त्यांना पोलिसांकडून बाजूला करण्याचं काम करण्यात आलं आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार सुनील शिंदे देखील यावेळी उपस्थित होते.

वरळीतील कोळीवाड्यात दोन्ही शिवसेनेचे कार्यकर्ते आमने सामने आल्याचं पाहायला मिळाली. या ठिकाणी दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांना वेगळं करण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला. यावेळी दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. एकनाथ शिंदे आणि आदित्य ठाकरे आमने सामने आल्याचं पाहायला मिळालं. पोलिसांनी मध्यस्थी करत एकनाथ शिंदे आणि आदित्य ठाकरे यांना जाण्यासाठी मार्ग करुन दिला. या पाच मिनिटाच्या काळात कार्यकर्ते आक्रमक झाले. एकनाथ शिंदे तिथून जात असताना आदित्य



ठाकरे त्यांच्याकडे पाहत होते, अशी माहिती आहे. एकनाथ शिंदे परतीच्या मार्गानं गेले तर आदित्य ठाकरे समुद्राच्या बाजूनं पुढं गेलं. पोलिसांनी दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांना वेगळं करण्याचा प्रयत्न केला. अरुंद गल्लीतून दोन्ही नेते पास होत असताना कार्यकर्त्यांमध्ये धक्काबुक्की झाल्याचं पाहायला मिळालं. पोलिसांनी बंदोबस्त ठेवल्यानं मोठी घटना घडला नाही.

एकनाथ शिंदे समुद्राच्या बाजूनं येऊन निघून गेले आहेत. आदित्य ठाकरे आता समुद्राच्या दिशेने गेलं आहेत. हे सगळं होत असताना दोन्ही बाजूचे कार्यकर्ते यावेळी तिथं होते. एकनाथ शिंदे पास होत असताना आदित्य ठाकरे नाक्यावर थांबलेले दिसून येत आहे. आदित्य ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या कार्यकर्त्यांना वेगळं करण्यात पोलिसांना यश मिळालं. आदित्य ठाकरेंसोबत दादर माहीमचे आमदार महेश सावंत, आमदार सुनील शिंदे देखील होते.

वरळी हा आदित्य ठाकरे यांचा बालेकिल्ला मानला जातो. याच बालेकिल्ल्यात येऊन एकनाथ शिंदे कोळीबांधवांना भेटले आहेत. दोन्ही नेत्यांचं स्वागत ढोल ताशाच्या गजरात स्वागत करण्यात आलं. या ठिकाणी पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या ठिकाणी नारळी पौर्णिमेनिमित्त कोळी बांधवांमध्ये उत्साह असल्याचं दिसून आलं. एकनाथ शिंदे वरळीच्या कोळीवाड्यात येत त्यांनी कोळी बांधवांसोबत संवाद साधला.

आदित्य ठाकरे हे वरळी मतदारसंघाचे आमदार आहेत. एकनाथ शिंदे कोळीवाड्यात आले होते, त्यांच्यासोबत देखील कोळी बांधव आणि कार्यकर्ते उपस्थित होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निमित्तानं नेत्यांनी कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवण्याचा प्रयत्न करण्यात येतो. त्यामुळं एकनाथ शिंदे आणि आदित्य ठाकरे समोरासमोर आल्यानंतर दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली.

## संपादकीय....

# भारताची राजनीती

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यासोबत फोनवर चर्चा केली. यावेळी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी यूक्रेन सोबत सुरु असलेल्या युद्धासंदर्भातील स्थिती काय आहे याची माहिती नरेंद्र मोदी यांना दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्लादिमीर पुतिन यांना भारत दौऱ्याचं आमंत्रण देखील दिलं. रशियाचे अध्यक्ष पुतिन यांनी नरेंद्र मोदी यांना यूक्रेन युद्धासंदर्भातील ताज्या घडामोडींची अपडेट दिली आहे. नरेंद्र मोदी यांनी पुतिन यांनी दिलेल्या सविस्तर माहितीसंदर्भात धन्यवाद दिले आहेत. रशिया-यूक्रेन संघर्ष शांततेच्या मार्गानं सोडवावा ही भारताची भूमिका नरेंद्र मोदी यांनी मांडली. नरेंद्र मोदी आणि व्लादिमीर पुतिन यांच्या चर्चेत दोन्ही नेत्यांनी भारत आणि रशिया यांच्यातील संबंध आणि द्विपक्षीय अजेंडा यामध्ये झालेल्या प्रगतीचा आढावा घेतला. दोन्ही देशांमध्ये विशेष आणि विशेषाधिकार प्राप्त राजनैतिक भागीदारी अधिक वाढवण्याबाबत कटिबद्ध राहण्याबाबत चर्चा झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे अध्यक्ष पुतिन यांना या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या भारत रशियाच्या वार्षिक द्विपक्षीय शिखर संमेलनासाठी भारतात येण्याचं निमंत्रण देखील दिलं. रशियाचे अध्यक्ष पुतिन भारत दौऱ्यावर आल्यानंतर दोन्ही देशांमध्ये व्यापार, संरक्षण आणि ऊर्जा क्षेत्रातील सहकार्य वाढवण्याची आणि त्याला वेग मिळण्याची अपेक्षा आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ६ ऑगस्ट रोजी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदी आणि व्लादिमीर पुतिन यांच्यातील चर्चेला महत्त्व प्राप्त झालं आहे. भारतानं रशियाकडून तेल खरेदी सुरु ठेवल्यानं संतापलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या आठवड्यात भारतावर २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली होती. त्यावेळी रशियासोबत शस्त्र आणि तेल खरेदी संदर्भातील व्यापार सुरु ठेवल्यानं दंड आकारणार असल्याचं त्यांनी जाहीर केलं होतं. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी जोपर्यंत टॅरिफ संदर्भातील प्रश्न मिटत नाही तोपर्यंत भारतासोबत चर्चा करणार नसल्याचं म्हटलंय.

# ‘चले जाव’ घोषणांनी ब्रिटीशही थरकापला : ऑगस्ट क्रांती दिन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आत्मक्लेश करणारी व्यक्ती क्रांतिकारक अशी व्यक्ती असते. क्रांतिकारक हा शब्द विशेषण म्हणून वापरला जाऊ शकतो; समाजावर किंवा मानवाच्या काही पैलूंवर मोठा प्रभाव पडतो, कारण त्याला सर्वस्वी ठरविले जाते. ‘क्रांतीकारी’ याचा अर्थ असा क्रांतिकारी आहे जो एखाद्या व्यवस्थेविरुद्ध बंड करतो किंवा अन्याय, हिंसा किंवा काहीतरी चुकीचे आणि अस्वीकार्य अशा निर्णयाविरुद्ध बंड करतो. क्रांतीकारी ही अशी व्यक्ती आहे जी एकतर विद्रोह करते किंवा सद्य परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी त्याचे समर्थन करते. या ऐतिहासिक ‘चले जाव’ आंदोलनात ८ ऑगस्ट रोजी गोवालिया टँक मैदानावर ‘वंदे मातरम्’ हे प्रेरणादायी, वंदनीय गीत संपूर्ण कडव्यांसहीत संगीतकलानिधी मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर उर्फ मास्तर कृष्णराव यांनी झिंझोटी रागात तयार केलेल्या स्वकृत चालीत गाऊन सादर केले. यावेळी पेटून उठलेल्या भव्य जनसमुदायासमोर हे तेजस्वी गीत गाण्यासाठी प्रसिद्ध गायक व कट्टर देशभक्त असलेल्या मास्तर कृष्णरावांचीच निवड करण्यात आली होती. या गीतावर इंग्रजांनी बंदी घातलेली असताना स्वतः च्या जीवाची पर्वा न करता या गीताचे संपूर्ण कडव्यांसहित जाहीर गायन करणे हे फार मोठे धाडस होते.

या आंदोलनात जनता मोठ्या प्रमाणावर सहभागी झाली. देशभरात ९ लाख लोकांनी स्वतःला अटक करवून घेतली. दुसऱ्या महायुद्धानंतर १९४५ मध्ये इंग्लंड सत्ता बदल होऊन मेजर क्लमेंट टली यांच्या नेतृत्वाखाली त्रिमंत्री योजना सुरुवातीपासून भारताला स्वातंत्र्य देण्याबाबत अनुकूल होती. मार्च १९४७ मध्ये पार्लमेंटमध्ये बोलतांना मेजर क्लमेंट टली याने भारताविषयी धोरण स्पष्ट केले. इंग्लंड लवकरच भारताला स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न करेल व त्यासंबंधी वाटाघाटी करण्याकरिता भारतात त्रिमंत्री कमिशन पाठविण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली होती. मेजर टली यांच्या घोषणेनुसार २४ मार्च १९४७ रोजी त्रिमंत्री कमिशन भारतात आले. स्ट्रॅफर्ड क्रिप्स, लॉर्ड पेथिक लॉरेन्स व अलेक्झांडर हे तीन सभासद होते. या त्रिमंत्री कमिशनने राष्ट्रीय काँग्रेसची स्वातंत्र्याची मागणी करून एक योजना मांडली, ही योजना म्हणेजच त्रिमंत्री योजना होय.

भारत छोडो आंदोलन किंवा ऑगस्ट क्रांती हे ऑगस्ट १९४२ मध्ये संपूर्ण स्वराज्यासाठी सुरू झालेले नागरी असहकार आंदोलन चले जाव चळवळ होते. गांधीजींच्या करा किंवा मरा ह्या



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

संदेशाने या आंदोलनाची सुरुवात झाली होती. मुंबई येथे ८ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधींनी भारत छोडोचा नारा देऊन ब्रिटीशांविरोधात स्वातंत्र प्राप्तीसाठी आंदोलन उभारले होते. महात्मा गांधींजीसह कॉंगेस श्रेष्ठींना ९ ऑगस्ट १९४२ रोजी भारत छोडो आंदोलनाचा एक भाग म्हणून अटक करण्यात आली होती. या आंदोलनाचा गुप्त मसुदा सेवाग्राम येथे ९ जुलै रोजी बापुकुटीतील आदी निवासात तयार करण्यात आला होता आणि १५ जुलै रोजी काँग्रेस कार्य समितीतर्फे त्याला अंतिम स्वरूप देण्यात आले होते. त्या मसुद्याला पुढे वर्धा ठराव म्हणून मान्यता देण्यात आली आणि ९ जुलै २०१८ रोजी चले जाव चळवळीचा ७५ वा वर्धापन दिन संपन्न झाला. १९४२ साली याच तारखेला महात्मा गांधी यांनी ब्रिटीशांना चले जावचा आदेश दिला आणि त्या आदेशाने भारतातली जनता पेटून उठली. तिने उत्स्फूर्तपणे गावागावात सरकारच्या विरोधात आंदोलन केले. ह्या आन्दोलनाचे प्रतिसाद शहरी भागासह ग्रामीण भागातही पसरले. तत्कालीन ग्रामीण भागातील अग्रनी कार्यकर्ते असणारे बुलडाणा जिल्ह्यातील, नागझरी गावचे रखमाजी कायंदे (सावकार) यांनी शेकडो कार्यकर्ते आपल्या स्वखर्चाने मुंबईला आंदोलनात सहभागी केले होते. सेवाग्राम येथे झालेल्या या मसुदा बैठकीत जनआंदोलनाचे नियम, आंदोलन पुढे नेण्याचे सर्व अधिकार महात्मा गांधींकडे देण्यात येत असल्याचे यावेळी ठरविण्यात आले होते.

त्यानंतर २४ मार्च १९४७ रोजी लॉर्ड माऊंटबॅटन भारतात आले. भारतात आल्याबरोबर निरनिराळ्या नेत्यांच्या भेटी घेऊन त्यांनी फाळणीची योजना तयार केली. ३ जून १९४७ रोजी ही योजना प्रसिद्ध करण्यात आली. मुस्लिम लीग व राष्ट्रीय काँग्रेसने या योजनेला मान्यता दिल्यानंतर १८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटने यांवर ठराव पास केला. ब्रिटिश पार्लमेंटने पास केलेल्या भारताविषयीचा हा ठराव म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचा कायदा होय. अशा रितीने स्वातंत्र्याच्या कायद्यातील तरतुदीनुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत हा स्वतंत्र झाला. भारताच्या इतिहासात ९ ऑगस्ट हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन या नावाने साजरा केला जातो. भारत छोडो आंदोलन ही भारताच्या स्वातंत्र्याच्या लढाईतील एक महत्त्वाची घटना आहे आणि दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी भारत छोडो आंदोलन दिन म्हणून पण साजरा केला जातो. हा दिवस १९४२ मध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटीश राजवटीच्या विरोधात जन आंदोलन सुरू केला होता. आजदिनी ८३ व्या ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त शुभेच्छा !





# बीट स्तरीय स्पेलिंग बी स्पर्धेत सुपतगाव येथील विद्यार्थ्यांचे यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील डाळिंब येथे बीट स्तरीय स्पेलिंग बी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सुपतगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील १ली ते ७वी चे १४ विद्यार्थी सहभागी होते. तर स्पर्धेत सुपतगांव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सहावी वर्गातील श्रीयश ज्ञानेश्वर गुरव याने स्पर्धेत सहभाग घेत यश संपादन केल्याबद्दल मुख्याध्यापक कबाडे जी एम यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

शाळेतील श्रीयश गुरव याची तालुका स्तरावर निवड झाली आहे.

या वेळी बीट स्तरीय स्पेलिंग बी स्पर्धेतील सर्व शाळेतील विद्यार्थी, शिक्षक मल्लिनाथ सोळशे,राजेश सूर्यवंशी, चिदानंद स्वामी, नागनाथ बनसोडे, यांची उपस्थिती होती. शाळेतील शिक्षक एम एस सोळशे यांनी स्पर्धेतील नियम व मार्गदर्शन केले.

# भगत यांचा अमृत महोत्सवी सोहळा रविवारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सिन्नर तालुका संचालक तथा सिन्नर सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष कृष्णाजी गणपत भगत यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त भव्य नागरी सत्कार सोहळा रविवार दिनांक १० ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता मातोश्री नर्मदा लॉन्स, भैरवनाथ मंदिरा शेजारी या ठिकाणी संपन्न होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते प्रकाश भाऊ वाजे असतील .कृषी मंत्री ड माणिकराव कोकाटे, खासदार राजाभाऊ वाजे, मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ड नितीन ठाकरे , आमदार सत्यजित तांबे ,माजी आमदार सुधीर तांबे ,नाशिकचे माजी महापौर प्रकाश मते आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.



भगत यांनी तालुक्यात शिक्षण, समाजकारण, राजकारण, सांस्कृतिक आदींसह विविध क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण कार्य केले आहे .त्यांच्या कार्याची दखल घेऊन सिन्नरकरांनी या सत्कार सोहळ्याचे आयोजन केले आहे.

तरी या सत्कार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन विवेकभाऊ चांडक, पुंजाभाऊ सांगळे, अण्णासाहेब गडाख ड पी.बी.चांदोरे, राजेंद्र देशपांडे, राजेंद्र पवारॉ, प्रमोद प्रकाश नवसे आदींसह सत्कार सोहळा समिती सदस्य यांनी केले आहे.

# नारळी पौर्णिमा निमित्त श्री विठ्ठल रूक्मिणीमातेस अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : नारळी पौर्णिमे निमित्त श्री विठ्ठल रूक्मिणी मातेस पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये श्री विठ्ठलास सोने मुकुट, नाम निळाचा, कौस्तुभ मणी, मोठ्या दंडपेट्या जोड, हिऱ्याचा कंगन जोड, मोत्याची कंठी, मोत्याचा तुरा, लहान व मोठा शिरपेच, मत्स्य जोड, मोठी बोरमाळ, लक्ष्मीहार, तोडे जोड, मोहनमाळ, तुळशीची माळ तसेच श्री रूक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक राजेंद्र सुभेदार यांनी दिली.




# लोकमंगल बँक व नाभिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कर्ज विषयक मार्गदर्शन शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोकमंगल बँक व नाभिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सरणी व्यवसायकांचा कर्ज विषयक मार्गदर्शन तथा आयोग मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न.

संत सेनाजी महाराज किस शिल्पी महामंडळाचा व पर्यटन विभागाचा आई कर्ज योजनेच्या व्याज परतव्याचा लाभ सोलापूरतील सर्व सलून व्यवसायिकांनी व नाभिक बांधवांनी घ्यावा व आर्थिक सक्षम व्हावेत:आ. सुभाष बापू देशमुख



लोकमंगल बँक व नाभिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमान आयोजित कर्ज विषयक मार्ग फडकुले सभागृह मोठ्या उत्साहात संपन्न झाला व या प्रसंगी बँकेचे अध्यक्ष तथा आमदार सुभाष बापू देशमुख यांनी सोलापूर शहरातील नाभिक समाजातील सलून व्यवसायिकांनी संत सेनाजी महाराज केस शिल्पी महामंडळ व्याज परतावा कर्ज योजनेचा व आई पर्यटन कर्ज योजनेचा वैयक्तिक लाभाचा व्याज परताव्याचा लाभ जास्तीत जास्त नाभिक समाजातील सलून व्यवसायिकांनी घ्यावा व आपल्या व्यवसाय वाढवून आर्थिक सक्षम व्हावे याकरिता लोकमंगल बँक सर्वतोपरी सहकार्य मदत करेल असे मत बँकेचे अध्यक्ष आमदार सुभाष बापू देशमुख यांनी व्यक्त केले यावेळी सोलापूर शहरातील सलून व्यवसायिक व नाभिक बांधवांचा विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात आले याप्रसंगी महामंडळाच्या सोलापूर जिल्हा व्यवस्थापका वृषाली लहारे यांनी महामंडळाची सविस्तर माहिती उपस्थित सर्व व्यवसायांना दिली याचा जास्तीत जास्त लाभ देण्याचे आव्हान केले याप्रसंगी व्यासपीठावर नाभिक समाजाची ज्येष्ठ नेते पांडुरंग चौधरी हिंदूराव गोरे दुकानदार संघटनेचे अध्यक्ष अभय कुमार कांती प्रभाकर भालेराव राष्ट्रीय नाभिक संघटनेचे प्रदेश युवक अध्यक्ष सुधीर भाऊ गाडेकर, सकल नाभिक समाज समन्वयक किरण भांगे यांची प्रमुख उपस्थिती होती सदर कार्यक्रमास नाभिक समाजातील विविध दुकानदार संघटनेचे अध्यक्ष पदाधिकारी या सहज सलून व्यवसाय आणि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वंचित महिलांना शिधापत्रिकांचे अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर यांच्या हस्ते वितरण

**एकूण १९ लाभार्थी महिलांना शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : महसूल सप्ताहाच्या अनुषंगाने सोलापूर पुरवठा विभागाच्या वतीने समाजातील वंचित घटकांपर्यंत शिधापत्रिकांचा लाभ पोहोचविण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती मोनिका सिंग ठाकूर यांच्या हस्ते विधवा, परितक्त्या आणि अनाथ महिलांना शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले.

अप्पर जिल्हाधिकारी यांच्या दालनात आयोजित शिधापत्रिका वितरण कार्यक्रमास जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, निरीक्षण अधिकारी प्रफुल्ल नाईक, तसेच सामाजिक कार्यकर्ते नितीन कांबळे उपस्थित होते. यावेळी एकूण १९ लाभार्थी महिलांना शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले.



अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती मोनिका सिंग ठाकूर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, समाजातील प्रत्येक वंचित घटकापर्यंत शासनाच्या योजनांचा लाभ पोहोचविणे हे आमचे कर्तव्य आहे. पुरवठा विभागाने या उपक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केले असून, अशा उपक्रमांमुळे प्रशासन आणि समाज यांच्यातील विश्वास दृढ होतो. त्यांनी उपस्थितांना पुढील आठवड्यात विशेष बैठक घेऊन अधिक वंचित लाभार्थ्यांची शिफारस करण्याचे आवाहनही केले.

पुरवठा अधिकारी श्री. सरडे यांनी सांगितले की, अप्पर जिल्हाधिकारी यांचा समाजाभिमुख दृष्टिकोन प्रेरणादायी आहे. या उपक्रमात श्री. नितीन कांबळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले असून त्यांनी गोरगरीब महिलांसाठी सातत्याने पाठपुरावा केला.

जननायक विचारमंच व शिवशक्ती भीमशक्ती ग्राहक संघाचे प्रतिनिधी श्री. नितीन कांबळे यांनीही हा संवेदनशील उपक्रम राबवून विधवा परितक्त्या महिलांना मुख्य प्रवाहात आणले आहे. त्यामुळे असे उपक्रम नियमितपणे होऊन वंचित घटकातील लाभार्थ्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून दिला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

**लाभार्थींची नावे:**

रेश्मा शेडम, जया चव्हाण, वर्णा वाघमारे, पूजा पेद्दी, प्राजक्ता कांबळे, अंबिका देवकते, गायत्री विटकर, शशिकला देवकरे, अलका मेलगिरी, पूजा चव्हाण, मंगल लोंढे, लानुबाई दुपारगुडे, दिलशाद शेख, तहेरा बक्षी, रेश्मा शेख, शामल रणदिवे, विमलाबाई कांबळे, नौशाद बी. कातनकर, कल्याणी रमेजा.

# स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्रा. सचिन खोमणे यांना पीएच.डी. प्राप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागात कार्यरत असलेले प्रा. सचिन महादेव खोमणे यांना नुकतीच भारती विद्यापीठ (डीम्ड टू बी युनिव्हर्सीटी) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे मधून अभियांत्रिकी मधील मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागात ‘डिझाईन अँड डेव्हलपमेंट ऑफ मायक्रोचॅनेल फॉर सॉईल टेस्टिंग इन लॅब ऑन चिप अँप्लिकेशन’ या विषयात पीएच.डी. प्रदान करण्यात आली. त्यांनी आपला शोध निबंध भारती विद्यापीठामध्ये सादर केला होता. त्यांच्या या यशाबद्धल सर्वत्र कौतुक होत आहे.





भारती विद्यापीठ, पुणे मधील डॉ. प्रदीप व्ही. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या प्रेरणेने प्रा. सचिन खोमणे यांनी पीएच.डी. पूर्ण केली. प्रा. सचिन खोमणे यांनी मायक्रोफ्ल्युडिक्स या क्षेत्रात महत्त्वपूर्ण संशोधन केले आहे ज्यामध्ये मातीतील पोषणतत्व शोधण्यावर भर दिला आहे. या संशोधनात एनपीके डिटेक्शन बाय युजिंग लॅब ऑन चीपची ओळख करून दिली आहे. प्रा. खोमणे यांची यशस्वी कारकीर्द केवळ प्रबंधापुरती मर्यादित नाही तर त्यांनी पीएच.डी. दरम्यान २ संशोधन पेपर प्रतिष्ठित नियतकालिकांमध्ये प्रकाशित केले आहेत आणि २ पेपर आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सादर केले आहेत, ज्यामुळे त्यांच्या क्षेत्रातील नाविन्यपूर्ण योगदानाची ओळख निर्माण झाली आहे. त्यांचे कार्य ‘लॅब ऑन चीप’ क्षेत्रात दीर्घकालीन प्रभाव टाकेल आणि भविष्यातील संशोधनास प्रेरणा देईल. प्रा. सचिन खोमणे यांचे हे यश केवळ त्यांच्या समर्पण आणि कौशल्याचे प्रतीक नाही, तर स्वेरी महाविद्यालय, पंढरपूरला ही गौरवान्वित करणारे असे आहे. डॉ.सचिन खोमणे हे स्वेरीच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये गेल्या १३ वर्षांपासून उत्कृष्टपणे ज्ञानदान करत आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय जर्नल मधून त्यांचे १० शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. पीएच.डी. प्राप्त झाल्याबद्दल डॉ. सचिन खोमणे यांचा संस्थेचे नूतन सचिव प्रा. सुरज रोंगे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, डिप्लोमाचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी.एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, प्रा. सचिन गवळी, डॉ. करण पाटील आणि इतर प्राध्यापक उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव प्रा. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी डॉ. सचिन खोमणे यांचे अभिनंदन केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२




# मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास होणार कारवाई

## खडवली नदी बरोबरच विविध पर्यटन स्थळांवर बंदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण यांनी उपोद्घातातील अ.क्र. १ कडील पत्रामध्ये ठाणे ग्रामीण जिल्हयातील भिवंडी, शहापूर, मुरबाड, कल्याण , अंबरनाथ तालुक्यातील प्रसिध्द असणाऱ्या ठिकाणी नागरिकांची गर्दी ही पावसाळयामध्ये मोठ्या प्रमाणात होत असते. व सध्या पावसाळा सुरु झाला आहे. त्यामुळे अनेक जण नदी, तलाव, धबधबे, धरण परिसरात जातात. पण पावसामुळे या भागात जीवितास धोका निर्माण होतो. त्यामुळे अशा परिसरात जाण्यास जिल्हाधिकाऱ्यांकडून मनाई आदेश देण्यात आले आहेत. त्यात विविध पर्यटन स्थळांपैकी ठाणे जिल्ह्यातील प्रसिद्ध खडवली नदीचा देखिल समावेश असून वज्रेश्वरी नदी, उसगाव धबधबा, भातसा, तानसा, वैतरणा धरण, माहूली गड व पायथा, सापगांव नदी किनारा, कळंबे नदी,कसारा घाट धबधबे, अशोक धबधबा,आजा पर्वत, जांभा धरण, चौंडा धरण परिसर, हनुमान धबधबा ,चौढा,सिध्दगड, डोगरन्हावे, सोनाळे, हरिश्चंद्रगड, बारवी धरण, पडाळे धरण, गोरखगड, खडवली व टिटवाळा नदी परिसर, कांबा, पावशेपाडा, गणेश घाट, कोडेश्वर धबधबा, बारबी नदी, आंबेशिव नदी, चंदेरी गड, भोज, दहीवली, चांदप आस्नोली नदी, भातसा नदी, खडवली (सोर गाव हद्द) दहागांव (कातगांव) माळशेज घाट, नाणेघाट या पर्यटन स्थळांवर प्रवेश करणेस प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. त्यामुळे पावसाळ्यातील संभाव्य धोका टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, पर्यटकांनी या परिसरात जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

तर सुरक्षेचे नियम लक्षात घेता जिल्हाधिकारी ठाणे यांचे कडील मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल. आहे पोस्टर पडघा पोलीस स्टेशनच्या माध्यमातून खडवली नदीच्या परिसरात लावण्यात आले आहेत. सर्व संबंधित पोलीस स्टेशन, पोलिस पाटील, ग्रामपंचायत, संबंधित शासकीय कार्यालये यांना जिल्हा अधिकारी कार्यालयातून आदेशानुसार सूचना देण्यात आल्या आहेत. सदर मनाई आदेशामुळे पर्यटकांना ठाणे जिल्हाधिकारी यांच्या मनाई आदेशाचे पालन करावे लागणार आहे.

> **शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधीत रहावी, कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या मनाई आदेशाचे पालन सर्वांनीच करावे. नागरिकांनी, पर्यटकांनी आम्हाला सहकार्य करावे.**
> **–जितेंद्र ठाकूर (पोलिस निरीक्षक, पडघा पोलीस स्टेशन)**

ज्याअर्थी त्याअनुषंगाने ठाणे ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधीत रहावी, कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता काही बाबींवर दिनांक २६ जुलै २०२५ रोजीचे दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजी पर्यंत या कालावधीमध्ये निर्बंध घालणे आवश्यक असून त्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करणेस उक्त पत्रान्वये विनंती केली आहे.



भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ व आपत्ती व्यवस्थापन ऍक्ट २००५, चे सेक्शन ३४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) यांचे कार्यकक्षेतील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये शांतता, कायदा व सुव्यवस्था आबाधीत रहावी, कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता गणेशपुरी, शहापूर,कसारा,किन्हवली,मुरबाड कल्याण, कुळगांव ,पडघा,वासिंद, टोकावडे पोलीस स्टेशन निहाय नमूद पर्यटन स्थळांवर प्रवेश करणेस प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

# महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतली प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवीदिल्ली / मुंबई : महाकारुणी तथागत भगवान गौतम बुद्धांना बुद्धगया येथील महाबोधी वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली त्या परमपवित्र स्थळी महाबोधी महाविहार उभारण्यात आले आहे.जगभरातील बौद्धांचे सर्वोच्च श्रद्धास्थान बुद्धगया येथील महाबोधी महाविहार आहे. त्याची विश्वस्त व्यवस्था ही १९४९ च्या बी टी ऍक्ट नुसार चालते त्यात ४ बौद्ध आणि ४ हिंदू ट्रस्टी असून कलेक्टर चेअरमन असतो.त्यात बदल करून सर्व ट्रस्टी आणि चेअरमन हे बौद्धच असले पाहिजेत असा कायदा



करून महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे अशी आग्रही मागणी आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची संसदेत भेट घेऊन केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासोबत ना.रामदास आठवले यांनी १० मिनिटे चर्चा केली. यावेळी सिन्दुर ऑपरेशन द्वारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानी दहशतवादी अड्डे नष्ट करण्याची केलेली कामगिरी उत्कृष्ट असून त्याबद्दल सर्व देशवासी आपले आभार मानत असल्याचे सांगत ना. रामदास आठवले यांनी प्रधानमंत्र्यांचे सिन्दुर ऑपरेशन केल्याबद्दल अभिनंदन केले.

रिपब्लिकन पक्ष राष्ट्रीय स्तरावर एन डी ए चा घटका पक्ष आहे तसाच महाराष्ट्रात महायुती चा घटक पक्ष आहे. महाराष्ट्रात सत्तेत रिपब्लिकन पक्षाला वाटा मिळत नसल्याची खंत मांडत रिपब्लिकन पक्षाला महाराष्ट्रात सत्तेत वाटा मिळाला पाहिजे अशी मागणी ना. रामदास आठवले यांनी केली.मुंबईत इंदुमिलस्थळी वेगाने उभारण्यात येणाऱ्या महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर अंतरराष्ट्रीय स्मारक कामाचे भूमिपूजन आपल्या हस्ते झाल्याची आठवण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना ना. रामदास आठवले यांनी करून दिली.

# येणाऱ्या सर्व निवडणुका धनुष्यबाणावर लढणार : माजी आमदार जयवंतराव जगताप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

सिद्धाराम म्हेत्रे, माजी आमदार शहाजी बापू पाटील, व मी शिवसेनेत सक्रिय झालो आहे.

यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख महेश चिवटे म्हणाले की, माजी आमदार जयंतराव जगताप यांच्या शिवसेना प्रवेशामुळे तालुक्यातील शिवसेना मजबूत झाली असून दिलेला शब्द पाहणारा नेता म्हणून माजी आमदार जयंतराव जगताप यांची संपूर्ण जिल्ह्यात ओळख आहे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विश्वास ठेवून आमदार जगताप यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे.

तालुक्यातील येणाऱ्या काळातील सर्व निवडणुका शिवसेनेच्या धनुष्यबान चिन्हावर लढवणार असून माझ्यावर प्रेम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांनी आतापासून प्रत्येक गावात शिवसेना मजबूत करून शाखा उद्घाटनाची तयारी करावी करमाळा तालुक्यात २५ हजार शिवसेना सभासद नोंदणी महिनाभरात करण्याची उद्दिष्ट समोर ठेवून काम करणार असल्याचे माजी आमदार जयंतराव जगताप यांनी शेवटी सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन अब्दुले यांनी



केले तर आभार मुख्याधिकारी सचिन तपासे यांनी मानले

# पांडुरंग तात्या कुंभार कु.शिवाई भांडे आणि तुळशीराम माळी यांचा सामुहिक सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे,ता ७ राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघ आणि महात्मा फुले अर्बन को. ऑप.बँक कळंब च्या वतीने आठवडी बाजार मैदान कळंब येथील माळी लॅब येथे आयुर्वेदिक मेडिकल मधील एम डी साठी देशातुन २११ व्या तर राज्यातुन टॉप टेन मध्ये स्थान मिळवल्या बद्दल तर कळंब नगरीचे माजी नगराध्यक्ष श्री पांडुरंग तात्या कुंभार यांची महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश सचिव पदी निवड करण्यात आल्याबद्दल जाहीर सत्कार करण्यात आला.




कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शहरातील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ तथा कळंब रेल्वे कृती समिती प्रमुख डॉ रामकृष्ण लोंढे तर प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प.महादेव महाराज आडसुळ हे होते. कु.शिवाईचा गुणगौरव करताना डॉ. लोंढे यांनी मेडिकल क्षेत्रातील सध्याचे वास्तव मांडत तिने रिसर्च क्षेत्रात जावे अशी अपेक्षा व्यक्त केली.कोणताही वारसा पाठीमागे नसताना महाविद्यालयीन काळात क्रीडा क्षेत्रातील प्राविण्य सोबत मित्र मंडळी जमवत आज काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी पोहोचणे यामागचा संघर्ष महत्वाचा होता असे महादेव महाराज अडसूळ यांनी सांगितले.

कळंब शहरातील तहसील कार्यालया समोरील चौकास क्रांती सुर्य महात्मा जोतीराव फुले नाव देण्यात यावे यासाठी प्रयत्न करुन चौक सुशोभीकरणासाठी स्थानिक आमदारांकडे निधी मिळणेबाबत पाठपुरावा केल्याबद्दल श्री तुळशीराम माळी यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे राज्य सरचिटणीस श्री संतोष भोजने यांनी तर आभारप्रदर्शन सावता माळी रोपवाटिका संचालक श्री ज्ञानेश्वर तोडकर यांनी केले.कार्यक्रमास माळी लॅब चे अरुण माळी, डॉ राजेंद्र गोरे, शिक्षणविस्ताराधिकारी संतोष माळी,जयपाल शिंदे, नानासाहेब कवडे, डॉ अशोक शिंपले,धीरज दुधाळ, पत्रकार माधवसिंग राजपूत, सचिन क्षिरसागर, बिभिषण यादव, प्रेमचंद गोरे, मुख्याध्यापक सुनील अहिरे,मोहन पौळ, आकाश माळी, बी. आर. साबळे,शुभम करंजकर आतिक पठाण यांच्या सह मान्यवर उपस्थित होते.

# मराठा आरक्षण आंदोलनासाठी बोळेगाव येथून शेकडो कार्यकर्ते मुंबईला जाणार : बैठकीत केला निर्धार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : कुनबी मराठा आंदोलनाचे जनक अंतरावली सराठी येथील संघर्ष नायक मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली मुंबई येथे दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी मराठा आरक्षण मागणी करिता आयोजीत आंदोलनास बोळेगाव ता.तुळजापूर येथून शेकडो कार्यकर्ते जाणार असा निर्धार येथील बैठकीत करण्यात आला.

सरसकट मराठा समाजाला कुनबी मराठा जातीचे दाखले देवून त्यांना ओबीसी प्रवर्गाततील आरक्षणाचा लाभ द्यावा या मागणीकरित मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली दिं.२९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे आयोजीत मोर्च्याच्या पूर्व तयारी



संदर्भात मराठा क्रांती मोर्चाये नेतृत्व तेजस बोबडे बप्पा नवडे यांच्या मार्गदर्शनाखाली बोळेगाव ता.तुळजापूर येथे नूकतच बैठक घेण्यात आली यावेळी उपस्थितीत मान्यवर सरपंच विलास पाटील तंटामुक्त अध्यक्ष प्रकाश सूर्यवंशी पोलीस पाटील कडाजी सूर्यवंशी सुरवसे ग्रामपंचायत सदस्य सुनील सूर्यवंशी सोपान सुरवसे माजी सैनिक सतीश सूर्यवंशी माजी सरपंच गुणवंत रुपनर संजय सुरवसे विनोद सुरवसे परमेश्वर सुरवसे सदानंद सुरवसे संजय सुरवसे अरुण शिवाजी सुरवसे पवन सुरवसे बालाजी सुरवसे राहुल सुरवसे दत्ता जाधव राम सुरवसे अंगत जाधव प्रतिष्ठित नागरिक व युवा वर्ग शहाजी अनंत सुरवसे नागेश हलोरे गोरख चव्हाण रामचंद्र सुरवसे कमल काळे दत्ता साळुंखे महिला सखुबाई सुरवसे विजयाबाई काळे चमाबाई सुरवसे प्रेमीला सुरवसे सरुबाई सुरवसे संगीत सुरवसे द्रोपती रुपनर सह शेकडो कार्यकर्त्यांनी सदरआंदोलनामध्ये स्वखर्चाने सहभागी होण्याचा निर्धार केला आहे

## वाल्मिकी संघाचे गणेश अंकुशराव यांचा इशारा

# अन्यथा मैला मिश्रीत चंद्रभागेचं पाणी पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना कमंडलूमध्ये पाठविणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी)– लाखो साधुसंताच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या चंद्रभागेच्या पाण्यामध्ये नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे ६५ एक एकर परिसरातील शौचालय व आजूबाजूच्या मठातील शौचालयातील सांडपाणी चेंबर मधून डायरेक्ट चंद्रभागेच्या पात्रात मिसळत आहे, त्यामुळे लाखो करोडो भाविकांचं श्रद्धास्थान असणाऱ्या चंद्रभागेच्या पवित्र पाणी दूषित होत आहे.

> **पावित्र्य धोक्यात; नगरपालिका प्रशासनाने लक्ष घालण्याची गरज**

लवकरात लवकर नगरपालिका प्रशासनाने याचे गांभीर्य ओळखून चंद्रभागेत मिसळणार पाणी बंद न केल्यास आम्ही महर्षी वाल्मिकी संघाच्या वतीने चंद्रभागेचं पाणी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना व संबंधित मंत्र्यांना कमांडलूमध्ये पाणी पाठविणार असा इशारा आम्ही महर्षी वाल्मिकी संघाच्या वतीने गणेश अंकुशराव यांनी दिला आहे.

हे मैला मिश्रित पाणी चंद्रभागेच्या पात्रात मिसळत असल्यामुळे अनेक भाविकांच्या भावना दुखवणारा कृत्य नगरपालिका करत आहे. हे घाण पाणी मिसळल्यामुळे चंद्रभागा पूर्ण दूषित झालेले आहे. हजारो भाविक भक्त चंद्रभागेच्या पाण्यात स्नान करतात तसेच पाणी तीर्थ म्हणून सेवन करतात त्याच बरोबर आपल्या घरी पूजन करण्यासाठी चंद्रभागेचे पाणी घेऊन जातात. जर असे मैला मिश्रित पाणी तीर्थ म्हणून सेवन केल्यामुळे भाविक भक्त आजारी पडतील. त्यामुळे तात्काळ याची दखल घेऊन चंद्रभागेमध्ये होत, असलेलं मैला मिश्रित पाणी तात्काळ थांबवावे, अन्यथा महर्षी वाल्मिकी संघाच्या वतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी गणेश अंकुशराव यांनी दिला.



# भूमी अभिलेख कार्यालय सिंदखेडराजा येथे नागरिकांना सनद वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सध्या महाराष्ट्रामध्ये महसूल विभागामार्फत महसूल सप्ताह साजरा होत आहे. भूमि अभिलेख विभाग हा महसूल विभागाचा एक महत्त्वाचा घटक असून जमीन विषयक सर्व गोष्टींची घडामोड या विभागामार्फत होत असते. शेतकऱ्यांच्या जमीनीच्या हद्दकायम, पोटहिस्सा, गुंठेवारी, बिगरशेती, कोर्ट कमिशन मोजणी, भुसंपादन मोजणी इत्यादी प्रकारची मोजणी कामे करत असते.



जमिनीच्या मोजणी प्रकरणांमुळे हा विभाग नेहमी चर्चेत असतो. हा असा एकमेव विभाग आहे ई जिथे केलेल्या कामामुळे एक व्यक्ती नाराज तर दुसरी व्यक्ती खुष होते. परंतु भूमी अभिलेख सिंदखेड राजा कार्यालयाचे सर्व कर्मचारी लोकांना चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करत असतात आणि लोकांच्या समस्या सुटाव्यात यासाठी प्रयत्नशील राहत असतात.

स्वामीत्व योजना ही केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असलेली आहे. महाराष्ट्र मध्ये महास्वामित्व योजनेअंतर्गत नागरिकांना सनद वाटप करण्यात येत आहे. काल भूमी अभिलेख कार्यालय सिंदखेड राजा येथे नागरिकांना सनद वाटप करण्यात आल्या आहेत.

मागील काही महिन्यात तालुक्यातील सोनोशी, पळसखेड चक्का, गुंज या गावामध्ये भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी कर्मचारी हे जाऊन,तिथे मार्गदर्शन शिबीर घेऊन तेथील नागरिकांना सनद प्रमाणपत्र वाटप केले आहेत.

मागील काही महिन्यामंध्ये सोनोशी गावामध्ये वाटप करण्यात आलेल्या सनदांची एकूण रक्कम १२,३१५₹ आहे, पळसखेड चक्का गावामध्ये वाटप करण्यात आलेल्या सनदांची एकूण रक्कम २६,६००₹ आहे, गुंज गावामध्ये वाटप करण्यात आलेल्या सनदांची एकूण रक्कम ३२,१४५₹ इतकी आहे.

सनद वाटप करतेवेळी कार्यालयाचे मुख्यालय सहाय्यक मारोती थोरवे, परिरक्षण भुमापक गोपाल वाघमारे, निमतनदार राजाराम चोखट, भुमापक प्रकाश शिंदे,सय्यद शोएब, निवृत्ती वायाळ, संजय नागरे, दस्तगीर शेख, सूर्यकांत कुरंगळ इत्यादी उपस्थित होते

# बीड जिल्ह्याच्या विकासाच्या प्रक्रियेत पत्रकारांच्या सहकार्याची गरज

## उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे प्रतिपादन; जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने भव्य स्वागत समारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीड/प्रतिनिधी : मला काम करायला आवडतं, दिखावूपणा आपल्या स्वभावात नाही, सत्ताही लोकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आहे. त्यामुळे माझ्या परीने मी बीड जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी प्रमाणिक प्रयत्न करणार यासाठी नागरिकांबरोबर पत्रकारांचे सहकार्य आवश्यक आहे. तरुणांसाठी प्रशिक्षण केंद्र सुरू होणार आहे,जिल्हा स्टेडियमची सुधारणणे बरोबरच, विमानतळचाही विषय गतीने पूर्ण होईल.येत्या १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधुन बीड ते अहिल्यानगर ही रेल्वे सुरु करण्याचा प्रयत्न असल्याचे उपमुख्यमंत्री मा.अजित दादा पवार यांनी सांगितले.







बीड येथे जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने गुरुवार दिनांक ७ ऑगस्ट रोजी निलकमल सभागृहात बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार यांचा स्वागत समारंभ संपन्न झाला. आ.प्रकाश दादा सोळंके, आ.विजयसिंह पंडित, आ.विक्रम काळे, सचिव डॉ राजेश देशमुख जिलाधिकारी विवेक जॉन्सन मुख्य कार्यकारी अधिकारी जिथीन रहमान,जिल्हाध्यक्ष अॅड.राजेश्वर चव्हाण, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण काका आखाडे, डॉ योगेश क्षीरसागर,बीड शहराध्यक्ष अमर नाना नाईकवाडे यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानूरकर यांच्या हस्ते ना.अजित दादा पवार यांचा शाल,श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देवून यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संतोष मानूरकर यांनी अजित दादांच्या कार्यकाळात बीड जिल्ह्यामध्ये झालेल्या विविध विकास प्रकल्पांची माहिती दिली.बीड शहराच्या जायकवाडी बॅक वॉटर योजनेला मान्यता देण्याचे काम अजित दादांच्या नेतृत्वाखाली झाले होते आणि आज बीडचे पालकमंत्री म्हणून विकासाच्या बाबतीत बीड जिल्हा सर्वांगिण प्रगती करत असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी बोलतांना पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी बीड जिल्ह्याच्या सामाजिक आणि भौगोलिक परिस्थितीचा आलेख मांडला. हा जिल्हा पुरोगामी विचारांचा असून शरद पवार यांच्या नंतर अजित दादा पवार यांना या जिल्ह्याने साथ दिली. या पुर्वी विलासराव देशमुख यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद भुषवले होते. त्यानंतर ते मुख्यमंत्री झाले. तोच योग अजित दादा पवार यांच्या बाबतीत घडून यावा अशी अपेक्षा मुंडे यांनी व्यक्त केली. गतवर्षी दिक्षाभूमी ते मंत्रालयापर्यंत निघालेल्या पत्रकारांच्या संवाद यात्रेने राज्यभरात पत्रकारांची अभुतपुर्व एकजुट झाली असून त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी पुढाकार घ्यावा. राज्य सरकारने घोषणा केलेली पत्रकार आणि विक्रेत्यांसाठी चे महामंडळ कारवानीत करून भरघोस निधी द्यावा अशी मागणी मुंडे यांनी केली.

या कार्यक्रमात बोलतांना उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी गेल्या दोन दिवसात जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेत घेण्यात आलेले निर्णय तसेच बैठकांची माहिती दिली. बीड जिल्हा विकासाच्या बाबतीत गतीमान करण्यासाठी माझे प्रयत्न सुरु आहेत. प्रशासनात पारदर्शकता येण्यासाठी चांगल्या अधिकार्यांची नियुक्ती आपण केली आहे. नवीन प्रशासकिय इमारती दर्जेदार पध्दतीने व्हाव्यात यासाठी बांधकाम विभागाचे तज्ञ अधिकारी काम पहात आहेत. बीड शहरातील विद्युत पोल वरील तारांचे जाळे कमी करणे आवश्यक आहे. ज्यामुळे शहराचे सौंदर्य आणखी वाढेल. या सर्व गोष्टी करताना काही कठोर निर्णय सुध्दा आम्हाला घ्यावे लागतील. त्यासाठी नागरिकांनी आणि पत्रकारांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.बीड जिल्हा पत्रकार संघाने केलेल्या सत्काराबद्दल समाधान व्यक्त करताना अजित दादा म्हणाले की, काम करत राहणे हा आमचा पिंड आहे. केलेल्या कामाचे प्रदर्शन न करता ही आपली जबाबदारी आहे असे आम्ही समजतो.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.जाधव सर यांनी केले तर आभार प्रदर्शन दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लोकनेताचे संपादक बालाजी तोंडे यांनी परिश्रम घेतले.

### पत्रकार सन्मान योजनेत २० हजार रुपये पर्यंत वाढ

**कै.बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेचे मानधन २० हजार रु.पर्यंत वाढवण्यात आले आहे. त्याबद्दल राज्याचे अर्थमंत्री म्हणून ना.अजित दादा पवार यांचा पत्रकार संघाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.**

### महिला पत्रकारांचे रक्षाबंधन आणि दादांना दिले विमान

**पत्रकार संघाच्या कार्यक्रमात महिला पत्रकारांनी अजित दादांना रक्षाबंधना निमित्त राखी बांधली. तसेच बीडमध्ये विमानतळ मंजुर केल्याबद्दल संपादक वैभव स्वामी यांनी दादांना विमानाची प्रतिकृती भेट दिली.**

### साहित्यीक, कलावंतांची उपस्थिती

**बीड जिल्हा पत्रकार संघाने आयोजित केलेल्या अजित दादांच्या स्वागत समारंभाला संगित क्षेत्रातील जेष्ठ गायक भरत अण्णा लोळगे, अनिल हंप्रस,सतीश सुलाखे, प्रकाश मानूरकर तसेच साहित्य क्षेत्रातील डॉ.विद्यासागर पाटांगणकर,प्राचार्य सविता शेटे, नाट्य क्षेत्रातील डॉ.सुधीर निकम,डॉ.संजय पाटील देवळाणकर आदि उपस्थित होते. या सर्व साहित्यीक व कलावंतांनी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा प्रातिनिधीक स्वरुपात सत्कार केला.**

---

# युवा नेते सागर दादा कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिर





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी

हन्नूर गावचे उपसरपंच युवा नेते सागर दादा कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त, मौजे हन्नूर येथे आरोग्य शिबिर मोठ्या उत्साहाने संपन्न झाले. आरोग्य शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ नेते मल्लिनाथ कल्याणशेट्टी सर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सोनाली तळवार होते. प्रामुख्याने या आरोग्य शिबिरामध्ये, डोळ्याचे मोतीबिंदू ऑपरेशन लहान मोठे शस्त्रक्रिया, लहान मुलांचे आजार व त्यांची शस्त्रक्रिया, बाळाचे सर्व ऑपरेशन, किरकोळ आजारांवरील मोफत औषध उपचार व्यवस्था करण्यात आली होती. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ विनायक सर, डॉक्टर अण्णासाहेब लोखंडे, डॉ.अब्दुल , डॉ गौरव मल्हार डॉ डिसूजा, या वैद्यकीय शिबिराचे समन्वयक श्री अनंत जंजाळ, डाटा एन्ट्री ऑपरेटर श्री बागवान यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आरोग्य शिबिरा मध्ये, ३५० पेक्षा अधिक नागरिकांनी सहभाग घेतला, तेच ४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले, यावेळी युवा नेते उपसरपंच सागर दादा कल्याणशेट्टी यांनी शिबिरास्थळी भेट देऊन शुभेच्छा दिल्या, यावेळी माझी उपसरपंच शरणाप्पा हेगडे, तंटामुक्त अध्यक्ष सिद्राम पुजारी, ज्येष्ठ नेते सोपान निक्ते,मा.ग्रामपंचायत सदस्य धोंडीराम बाळशंकर, गुड्डू भाई जमादार अमीन मुल्ला आदी मान्यवर उपस्थित होते शिबिर यशस्वी होण्यासाठी, दिनेश तळवार शरणापा बंदीछोडे विठ्ठल पारतनाळे, अनिल तळवार, प्रवीण कोरे महेश चितले विशाल सरसंबे, नागनाथ रोट्टे, गणेश हेगडे, नितीन बिराजदार व सागर दादा कल्याणशेट्टी मित्र परिवार आदींनी परिश्रम घेतले.

# कवी भीमराव कालेनंद यांना गायनातून अनोखे अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : अखिल बहुजन समाज प्रबोधन सांस्कृतिक संगीत कलावंत मंच यांच्या वतीने ज्येष्ठ गीतकार भीम राव काळेनंद यांना गायनातून मधुबन वृद्धाश्रम, कोंडेश्वर रोड, बडनेरा, जि. अमरावती येथे आदरांजली वाहण्यात आली आहे.सदर कार्यक्रमाचे आयोजक धम्मनाथ जगताप, कवि, उर्दू शायर विजय टेंभुर्ण, संजय तायडे, एन. लांबसोंगे होते.



माझ्या भिमाच्या नावाचं कुंकू लाविलं रमानं, सहा डिसेंबर छप्पन साली वेळ कशीही घेरली, दृष्ट काळाने भिमरायाची प्राणज्योती चोरली, मी जगेल तर या समाजाच्यासाठी, मी मरेल तर या समाजाच्यासाठी, असे अनेक भिमगिते, बुध्दगीते, महात्मा ज्योतीबा फुले, शाहु महाराज, शिवाजी महाराज, अन्नाभाऊ साठे, रमाई, सावित्रीमाता, जिजाऊ माता गिते व इतर भक्तीगीते त्यांच्या लेखनीतुन प्रकाशित झाले ते दिवंगत भीम राव कालेनंद यांना गायनाच्या कार्यक्रमातून आदरांजली वाहण्यात आली. अनेक दिग्गज गायकांनी त्यांची गाणी गायीले आहेत. यावेळी सम्राट काळेनंद ,राष्ट्रीय केंद्रीय अध्यक्ष, धम्मनात शिव जगताप, राष्ट्रीय केंद्रीय सचिव कवी शायर विजय बाबू टेंभुर्णे उर्फ घायल, बडनेरा.सदस्य गायक संजय तायडे बडनेरा, के एन लाम सोंगे वर्धा, गायिका लक्ष्मीताई चंदनखेडे अमरावती, कवी राजू सोनाने कारंजा, निरंजन भगत वाशिम, गायक प्रेम बाबू सुस्मित वर्धा, गायक यशवंत पानतावणे वर्धा, बँजो मास्टर रंगारी , गायक वासुदेवराव , गुणवंता पाटील तबलावादक, कवी सुरजनारायण रावखर्डे, तबलावादक सचिन शंभरकर वर्धा, गायक अनिल पटवानेतर तर आदी उपस्थित होते.

---

## ऊस शेतीसाठी ए. आय. तंत्रज्ञानाची कार्यशाळा व शेतकरी मेळाव्यात मार्गदर्शन

## विविध समस्यांवर होणार मात

# विकसित भारताचा संकल्प ए. आय. तंत्रज्ञानाच्या जोरावर : महसुलमंत्री बावनकुळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील मुरूम येथील श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखाना व शरण पाटील फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने कारखाना परिसरात गुरुवारी (दि.७) ऊस शेतीसाठी ए. आय. तंत्रज्ञानाची कार्यशाळा व शेतकरी मेळाव्यात मार्गदर्शन करताना महसुमंत्री बोलत होते.






यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री बसवराज पाटील, माजी मंत्री आ. राणाजगजितसिंह पाटील, संजय कोडगे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापुराव पाटील, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुरेश बिराजदार, युवा नेते शरण पाटील, सुनिल चव्हाण, किरण पाटील, मिलिंद पाटील, नितीन काळे, व्यंकटराव गुंड, कारखान्याचे कार्यकारी संचालक सुरेश गवसाने, बसवराज कस्तुरे, बलभिम पाटील आदी मान्यवर उपस्थितीत होते.

पुढे बोलताना मंत्री बावनकुळे म्हणाले की, विकसित भारताचा संकल्प ए. आय. तंत्रज्ञानाच्या जोरावर केला आहे. इथेनॉल व ऊस गाळपासाठी वेगवेगळे तंत्रज्ञान वापरायचे आहे. ४५ लाख शेतकऱ्यांना मोफत विज पुरवठा करुन दिवसा १२ तास वीज पुरवठयासह घरगुती विजेचे दर कमी करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. आता भावकीमध्ये शेती विकायची असेल तर ५०० रुपयांच्या स्टॅम्पवर तर वाटणीपत्र २०० रुपयांच्या स्टॅम्पवर होणार आहे. शेतकरी, शेतमजूर, उद्योजक यांच्यासाठी मागेल ती मदतीसाठी सरकार कटिबद्ध असल्याचे अभिवचन बावनकुळे यांनी दिले. यावेळी बोलताना बसवराज पाटील म्हणाले की, शरण पाटील फाउंडेशनच्या वतीने सर्वच शेतकऱ्यांना फाउंडेशनच्या वतीने लोक वाटा देऊन काम सुरू आहे. ही लोकचळवळ झाली आहे. मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळवून देऊन मराठवाड्याला दुष्काळ मुक्त करावे, बंद कारखाने सुरु करुन नविन उद्योग मराठवाड्यात आणुन युवकांना रोजगार उपलब्ध करून दयावा व जिल्हा बँकेला मदत करुन गतवैभव मिळवून देण्याची मागणी यावेळी श्री पाटील यांनी केली. यावेळी शरण फाऊंडेशनचे अध्यक्ष शरण पाटील यांनी प्रास्ताविकात शेतकऱ्यांसाठी विठ्ठलसाईच्या माध्यमातून अविरत काम सुरू आहे. उमरगा व लोहारा तालुक्यातील शरण पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून शेतरस्त्याची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू असुन शेतरस्त्यासाठी शासनाचा निधी वाढवण्याची मागणी यावेळी केली. या मेळाव्यात शेतकरी बांधव हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते.

शेतकऱ्यांसाठी, एआय प्रचंड प्रमाणात माहिती उलगडू शकते जी त्यांना त्यांच्या पिकांसाठी अधिक हुशार निवडी करण्यास मदत करू शकते आणि ते ज्या शेतात वाढतात त्यांचे संरक्षण करते.

शेतकऱ्यांचे चांगले हेतू असूनही, निसर्गमातेच्या इच्छा पिकांच्या उत्पादनाचे आरोग्य आणि गुणवत्ता - आणि शेवटी, शेतकऱ्यांचे उत्पन्न - बनवू किंवा बिघडू शकतात. म्हणून, लागवडीच्या हंगामासारख्या विशिष्ट वेळी हवामानाचा अंदाज लावू शकतील अशा भाकित साधनांनी शेतकऱ्यांना सुसज्ज करणे म्हणजे ते त्यांची पिके भरभराटीसाठी आदर्श परिस्थितीत लावू शकतात. ही साधने शेतकऱ्यांना जोखीम व्यवस्थापित करण्यास देखील मदत करतात. तीव्र हवामान घटनेची पूर्वसूचना मिळाल्याने शेतकऱ्यांना त्यांची पिके सुरक्षित करण्यासाठी आणि शक्य तितके त्यांचे संरक्षण करण्यासाठी एक महत्त्वाची खिडकी उघडते. यामुळे वादळात पिकांच्या काही ओळींचे नुकसान आणि संपूर्ण पिकाचे नुकसान यातील फरक दूर होऊ शकतो.

प्रेडिक्टिव्ह परफॉर्मन्स ॲनालिटिक्सची हीच ताकद आहे. ते एआय आणि मशीन लर्निंगचा वापर करून दशकांच्या ऐतिहासिक डेटाचा अभ्यास करून परिणामांचा अंदाज लावते आणि जोखीम अपेक्षित करते.

तथापि, ही विश्लेषणात्मक साधने केवळ हवामान अंदाजापुरती मर्यादित नाहीत. त्यांचा वापर कीटक आणि रोगांचे धोके, मातीची परिस्थिती, पीक वाढ आणि उत्पन्न क्षमता यांचा अंदाज घेण्यासाठी देखील केला जाऊ शकतो.

हे शेतकऱ्यांना रोगांच्या प्रादुर्भावाची आणि कीटकांच्या प्रादुर्भावाची रिअल-टाइम माहिती देते, जेणेकरून ते गरज पडल्यास अचूक उपचार लागू करू शकतील. याचा अर्थ शेतकरी त्यांचा रासायनिक वापर कमी करू शकतात, त्यांचा पर्यावरणीय परिणाम कमी करू शकतात आणि शेतीवर अधिक शाश्वत राहू शकतात. कृत्रिम बुद्धिमत्ता शेतीत क्रांती घडवत आहे, परंतु सर्वच शेतकरी त्याचे फळ मिळवत नाहीत.

समान संधी उपलब्ध नसल्यास, या 'एआय डिव्हिडन्स'मुळे लहान शेतकरी आणि मोठ्या प्रमाणात काम करणाऱ्या शेतकऱ्यांमधील दरी वाढण्याचा धोका आहे. पण आपण एआय क्रांतीचे लोकशाहीकरण करू शकतो. तंत्रज्ञान सर्व शेतकऱ्यांना सक्षम बनवते याची खात्री करून, त्यांच्या शेताचा आकार किंवा स्थान काहीही असो, आपण शेतीतील एआय असमानता दूर करू शकतो.

प्रत्येक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे क्रांतिकारी बदल घडत आहेत. कृषी क्षेत्र सुद्धा याला अपवाद नाही. येत्या काळात बदलते हवामान, अवेळी पडणारा पाऊस, पीकांवर वारंवार होणारा रोगांचा प्रादुर्भाव, मजुरांचा तुटवडा यांवर मात करत शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्याबरोबरच त्यांच्या उत्पादन खर्चात बचत करण्यासाठी कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेला पर्याय नाही. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्यामुळे पीक आरोग्याचे विश्लेषण, मातीतील कार्बन प्रमाण शोधणे, मातीच्या आरोग्याची सविस्तर माहिती, तणाचा प्रकार ओळखणे, पूर्वीच्या उत्पन्नाची तुलना, मातीचे तापमान, वातावरणातील आर्द्रता, पिकांवरील कीड व रोगांचा प्रादुर्भाव ओळखणे, तसेच पिकांवरील जैविक-अजैविक ताण ओळखणे शक्य होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर केल्यास पीकांच्या उत्पादनात वाढ, मजुरी खर्चात बचत, रसायनिक खते व औषधांच्या वापरात कपात, कापणी कार्यक्षमतेत वाढ, रोगनियंत्रणाद्वारे बचत, पुरवठा साखळीतील कार्यक्षमतेत वाढ आणि एकूण खर्चात कपात होणे शक्य होईल; असे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

या वेळी पाऊस व रात्री ऊशीर झाला असतानाही परिसरातील शेतकरी , शेतमजुर, व्यापारी, कार्यकर्ते,पदाधिकारी यांची मोठ्या सख्येने ऊपस्थिती होती.